दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १६ वे ● अंक ३६० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२७ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### लाखो शिवप्रेमी, दासभक्तांची प्रतिक्षा संपणार

## उरणमध्ये २० मीटर उंचीचे ऐतिहासिक शिवस्मारक पर्यटकांसाठी होणार खुले



**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातीलच नव्हे तर महाराष्ट्राची मान उचावणाऱ्या उरण येथील जेएनपीटीने ३२ कोटी खर्चून उभारलेल्या व लाखो दासभक्तांना उत्कंठा लागून राहिलेले ऐतिहासिक भव्य दिव्य २० मीटर उंचीचे शिवस्मारक पर्यटकांसाठी येत्या आठ दिवसांनंतर खुले करण्यात येणार असल्याची माहिती जेएनपीटी वरिष्ठ प्रबंधक तथा सचिव जयंत ढवळे यांनी दिली. कोवीड काळात मागील दोन वर्षांपासून बंद ठेवण्यात आलेले शिवस्मारक खुले करण्यात येणार असल्याने शिवप्रेमी, दासभक्तांमधुन आनंद व्यक्त केला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्राची शान ठरू पाहाणाऱ्या उरण येथे जेएनपीटीने उभारलेल्या शिवरायांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे मेमोरियल म्युझियम शिवस्मारकाचे तीस महिन्या पूर्वी लोकार्पण करण्यात आले आहे. विविध सुविधा असलेल्या अत्याधुनिक भव्य- दिव्य स्मारकाची मागील अडीच वर्षांपासून देशभरातील शिवप्रेमी, दासभक्त, पर्यटक आणि नागरिक आदी सर्वांनाच मोठी प्रतिक्षा लागून राहिली होती. कोवीड काळात बंद ठेवण्यात आलेले २९ मीटर उंचीचे बहुचर्चित शिवस्मारक पर्यटकांसह सर्वासाठीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

उरण तालुक्यातील जासई-दास्तानफाटा दरम्यान लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या शिवस्मारकांची उभारणी करण्यात यावी अशी मागणी केली होती. त्या मागणीची दखल बंदर प्रशासनाने घेऊन जेएनपीटी प्रशासनाने ३२ कोटी खर्चुन २० मीटर उंचीचे भव्य शिवस्मारक नऊ हजार चौरस मीटर क्षेत्रात उभारण्यात आले. पाच मजल्यापर्यंत उभारण्यात आलेल्या तळ मजल्यावर ४८० चौरस मीटरचा भव्य बहुउद्देशीय सभागृह आहे. या सभागृहात कॅन्टीन, ग्रीनरुम आणि संग्रहालय उभारण्यात आले आहे. या संग्रहालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. पहिल्या मजल्यावर दोन खुल्या बाल्कनी असुन या बाल्कनीमधुन चहुबाजूंनी असलेल्या .../२

# मोफत रेशन योजना सप्टेंबरपर्यंत सुरु राहणार

## चौकशी अहवाल बदलण्यासाठी मागीतली १५ हजार लाच ; रायगड विभागाची कारवाई




**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

देशात सुरू असलेल्या मोफत रेशन योजनेची मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत मोफत रेशन योजना यावर्षी सप्टेंबरपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मोफत रेशन योजना ३१ मार्चला संपत होती. परंतु, त्याची मुदत आता सप्टेंबरपर्यंत सुरु ठेवण्यात येणार आहे. या योजनेची मुदत वाढवण्याच्या निर्णयाबाबत पंतप्रधान मोदींनी ट्विट केले आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या शक्तीत भारताचे सामर्थ्य आहे. ही शक्ती आणखी मजबूत करण्यासाठी सरकारने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सहा महिन्यांनी वाढवली आहे. ही योजना सप्टेंबर २०२२ पर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील ८० कोटींहून अधिक लोकांना पूर्वीप्रमाणेच याचा लाभ घेता येईल. असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोरोना महामारीच्या काळात सुरु करण्यात आलेल्या मोफत रेशन योजनेला तीन महिन्यांनी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मार्च २०२२ पर्यंत असलेली ही योजना आता जूनपर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये १५ कोटी लोकांना मोफत रेशन देण्याची तरतूद आहे. या योजनेंतर्गत राज्यातील १५ कोटी जनतेला पुढील तीन महिने अन्नधान्य योजनेंतर्गत डाळ, मीठ, साखर याबरोबरच अन्नधान्य मिळणार आहे. शुक्रवारी योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक आज सकाळी पार पडली. यात मोफत रेशन योजनेला तीन महिन्यांची मुदवाढ देण्यात आली. त्यानंतर आज पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही योजना आणखी सहा महिने पुढे वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## रोहा नगर पालिकेकडून धडक कारवाई ; २५ कर थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कापले



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा अष्टमी नगर पालिकेने मार्च अखेरचा टार्गेट पूर्ण करण्यासाठी जोरदार वसूली मोहीम सुरू केली आहे. थकबाकीदार यांच्या गाळ्यांना सील ठोकल्यानंतर २५हजार रुपयेहुन अधिक रक्कम जमा करण्यात दिरंगाई करणाऱ्या नागरिकांचे नावे असलेले बेनर्स लावून अनोख्या कारवाईचा नमुना सादर केला आहे. आता मात्र थकबाकीदारांचे नळ कनेक्शन तोडण्याचा धाडसी निर्णय घेतला असून आता पर्यंत २५ जणांचे नळ कनेक्शन कापून त्यांचं पाणी पुरवठा खंडित करण्यात आला आहे.

रोहा अष्टमी नगर पालिकेला दरवर्षी मालमत्ता करापोटी ३ कोटी ९१लाख ७१ हजार तर पाणीपट्टीतून १ कोटी ७२ लाख १२ हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. मात्र मागील दोन ते अडीच वर्षे कोरोनामुळे वसूली न केल्याने यंदा ५ कोटी ३० लाख ६७६० रुपये वसुलीचे उद्दिष्ट होते. त्यापैकी शनिवार दि. २६ पर्यंत २ कोटी ५१ लाख ३० हजार रुपयांची कर वसूली रोहा नगर पालिकेने पूर्ण केली आहे. तर ३१ मार्च पर्यंत १कोटी ८६ लाख रुपयांची कर वसूली करण्याचे आव्हान नगर पालिके समोर आहे.

थक बाकी भरून नागरिकांनी नगर पालिकेला सहकार्य करावे. वेळीच कर न भरल्यास नळ कनेक्शन कट करणे, मालमत्ता जप्त करण्या सारखी कारवाई केली जाणार आहे. कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी कर भरून नगर पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी केले होते. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या आवाहनाला पाहिजे तसं प्रतिसाद न मिळाल्याने मंगळवार दि. २२ पासून नगर पालिकेने धाडसी निर्णय घेतला आहे. २० हजार .../२

> कर वसूली १००% व्हावी यासाठी रोहा नगर पालिकेतील कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सुट्टीच्या दिवशी देखील कर वसूलीला गती दिली जात आहे. उर्वरित ५ दिवसात कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न आहे, कारवाई टाळण्यासाठी नगर पालिकेला नागरिकांनी सहकार्य करावे.
>
> **दयानंद गोरे - मुख्याधिकारी**
> **रोहा नगर पालिका**

### महावितरणला कंत्राटी कामगारांचा 'शॉक'

## खोपोली महावितरण कंत्राटी कामगारांना पगारांसह विविध सुविधा न मिळाल्याने आजपासून त्यांचे कामबंद आंदोलन



**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील महावितरण कंपनीच्या खोपोली डिव्हिजनमध्ये कंत्राटी कामगारांना तीन महिन्यांपासून पगार न मिळाल्यामुळे अखेर २० कंत्राटी कामगारांनी आजपासून 'कामबंद' आंदोलन पुकारले आहे. दरम्यान, याबाबत पनवेल उपविभागीय अधिकारी शिवाजी वायफळकर यांच्याशी संपर्क केले असता उद्या पगार होईल, असे त्यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, महावितरणमध्ये फक्त पगाराचा विषय नसून कंत्राटी कामगारांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचेही कंत्राटी कामगारांनी सांगितले. ठेकेदाराशी जेव्हा ही पगाराची चौकशी केली असता त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे मिळतात. ठेकेदाराकडून अद्यापही कामगारांना पेमेंट स्लीप तसेच टीएनपी दिली जात नसून प्रत्येक वर्षी पावसाळी रेनकोट देखील मिळत नसल्याचे कंत्राटी कामगारांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले. ऐवढेच नव्हे तर फिल्ड वर्क करताना आवश्यक असलेल्या सोयी सुविधा, अवजारे ठेकेदाराकडून पुरविण्यात येत नसल्याचे सांगण्यात आले. तीन महिन्यांपासून पगार मिळत नसल्याने विकास कांबळे, कृष्णा पाटील, संतोष व्होला, मनोहर राठोड, सम्राट मोरे, नामदेव भला, महेंद्र निरगुडा, अरविंद कांबळे, राम हिंदोला, विजय खंडवी, ज्योती खराल, अमर माळी, दीपक राठोड, नारायण ठोंबरे, अक्षय पिंगळे, सखाराम ठोंबरे, मनोज राठोड, बाळकृष्ण जाधव, पद्माकर वाघ, .../२

## संक्षिप्त...

### १२० किमी वेगाने वाहन चालवण्यास परवानगी देणार : नितीन गडकरी

**सांगली : वृत्तसंस्था**

महामार्गावर ताशी १२० किलोमीटर वेगानं गाडी चालवण्यास लवकरच परवानगी देऊ, असं आज केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज सांगलीत सांगितलं. महाराष्ट्राला फाटकमुक्त करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. याशिवाय सांगलीत लॉजिस्टिक पार्क आणि सॅटेलाईट पूल उभारण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. नितीन गडकरी आज सांगली दौऱ्यावर आहेत.

गडकरींच्या हस्ते आज दोन राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांतील कामांचं लोकार्पण झालं. यावेळी जलसंपदा मंत्री जयंत पाटील, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, तसेच जिल्ह्यातील खासदार आणि सर्व आमदार उपस्थित होते. गडकरी यांच्या माध्यमातून चांगले रस्ते झाले अशा शब्दांत जयंत पाटील यांनी त्यांचं कौतुक केलं.

नितीन गडकरी म्हणाले, मी महाराष्ट्रचे -लर्रीरवी आहे. हवेतून चालणारी ८० लोक बसणारी बस सुरु करणार आहे. पुणे-शिरूर, वाघोली १२०० कोटीचा पूल उभारत आहे. जलसंवर्धन काम केले, रस्ते बांधताना एकही पैसा मागत नाही. सांगली-सोलापूर रस्त्यामध्ये नदी, नाले, खोलीकरण करुन दुष्काळी भागात शेततळे फुकट बांधून देणार आहे. सांगली जिल्ह्यात लॉजिस्टिक पार्क, सॅटेलाईट पूल उभारणार आहे. महाराष्ट्राला फाटकमुक्त करणार आहे.

## काँग्रेसचे महागाईच्या विरोधात आंदोलन




**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखिल भारतीय महिला काँग्रेस अध्यक्षा नेटा डिसोझा यांच्या आदेशानुसार, व संध्या सव्वालाखे यांच्या सूचनेनुसार, पनवेल जिल्हा महिला काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्षा निर्मला म्हात्रे यांच्या नेतृत्वात नविन पनवेल ब्लँक आध्यक्षा पुजा मोहन यांनी २६ मे रोजी वाढत्या महागाईच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

पेट्रोल, डिझेल, गॅस दरवाढ, अन्नधान्याचे वाढवलेले भाव याच्या निषेधात बीजेपी सरकार विरोधात घोषणा करून महिला पदाधिकाऱ्यानी तीव्र निषेध नोंदवीला; .../२

## श्रीवर्धन एसटी कर्मचारी संपावर ठाम ; आता न्यायालयीन निर्णयाकडे लक्ष

**दै.रायगड नगरी । दिघी**

राज्यभर एसटी कर्मचाऱ्यांचा विलीनीकरण होण्यासाठी आपला लढा सुरूच आहे. त्यासोबतच श्रीवर्धन आगारातील या संपाला आता जवळपास ५ महिने पूर्ण होत आहेत. यामध्ये शहरा मागोमाग गावाकडील अनेकांचा प्रवास रोखला आहे. मात्र, येथील कर्मचारी एसटी महामंडळ विलीनीकरणाच्या बाबत न्यायालयीन निर्णयाची वाट पहात आहेत.

राज्यव्यापी संपाला पाठिंबा देण्यासाठी श्रीवर्धन येथील कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन करण्यास सुरुवात केली. एसटी महामंडळाचे राज्यसरकार मध्येच विलीनीकरण करा या मुख्य मागणीसाठी येथील संपकरी ठाम आहेत. संपामुळे श्रीवर्धन - म्हसळा तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसह मुंबई पुणे अन्य शहरांकडे जाणाऱ्या अनेकांचा प्रवास सध्या बुडाला आहे.

त्यामुळे वाहतूक पूर्ववत होऊन .../२

## वाकण- पाली महामार्गावरील जंगली पीर येथे लोखंडी संरक्षण भिंत तुटल्याने प्रवाशांचा जीव टांगणीला

### उपाययोजना होणार तरी केव्हा प्रवासी वर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

वाकण -पाली या महामार्गावरील जंगली पीर जवळ रस्त्याच्या एका बाजूच्या लोखंडी संरक्षण भिंत तुटल्याने त्यामुळे प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. खोपोली -वाकण महामार्गावर रहदारीत वाढ झाली आहे. या महामार्गावर रात्रंदिवस वाहनाची रहदारी असतात.



मुंबई -पूणे एक्सप्रेशवेला जोडणारा वाकण-खोपोली हा रस्ता एक महत्वाचा दुवा आसल्याने त्यामुळे या महामार्गावर रहदारी करणा-या वाहनांची संख्या मोठी आहे.प्रत्येक जन लवकर नियोजित स्थली पोचण्यासाठी वाहन अति वेगाने वाहन चालवत असतात. घाईघाईने वाहन चालवत असताना पाली- वाकण मार्गवरील जंगली पीर येथील लोखंडी संरक्षण भिंत तुटल्याने ती लवकर लक्षात येत नाही. व तुटलेल्या भिंती जवळ सुरक्षाच्या विषयी कोणतेही उपाय योजना न केल्याने परिणामी अपघाताचा धोका निर्माण झालेला आहे.

एमएसआरडीसीच्या .../२

## एस.टी.कर्मचाऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत कामावर रुजू व्हा अन्यथा कठोर कारवाई : उपमुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । पुणे**

संपकरी एस.टी. कर्मचाऱ्यांवर आमचा कोणताही राग नाही किंवा कोणताही आकस नाही. हे कर्मचारी वेगवेगळ्या आवाहनाला बळी पडले आहेत. त्यांच्या मनात गैरसमज पसरविले जात आहेत, असे सांगतानाच ३१ मार्च, २०२२ पर्यंत एसटीच्या संपकरी कर्मचाऱ्यांनी कामावर रुजू व्हावे असं आवाहन परिवहन मंत्री अनिल परब यांनी दोन्ही सभागृहात केले. तसेच कोणाचीही नोकरी जाणार नाही, कर्मचारी कामावर आल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या इतर मागण्याबाबत चर्चा करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत मोठं विधान केलं आहे.

अजित पवार यांनी एसटी कर्मचार्यांना पुन्हा कामवर रुजू होण्याचे आवाहन केले आहे. तसं न केल्यास पवार यांनी कर्मचार्यांना इशारा दिला आहे. ३१ मार्चपर्यंत कुणाचं न ऐकता, आत्महत्येचा विचार न करता पुढे यावं आणि एसटीत रुजू व्हावं. तसेच आपलं आपलं काम सुरू करावं. ३१ मार्चपर्यंत नाही ऐकलं तर



स्पष्ट सांगतो जे येणार नाही, त्यांच्याबद्दल कठोर भूमिका घेतली जाईल. मग मात्र त्यांना वेगळी संधी मिळणार नाही असा इशारा अजित पवार यांनी दिला आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी असं म्हटलं आहे.

गेले अनेक महिन्यांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे. या संपाबाबत अधिवेशन कालावधीमध्ये शासनाची भूमिका सभागृहात मांडण्याबाबतच्या सूचना दोन्ही सभागृहातील सभापती व अध्यक्ष यांनी दिल्या होत्या. याबाबत परिवहन मंत्री ॲड. अनिल परब यांनी शेवटच्या दिवशी दोन्ही सभागृहात निवेदन केले. एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात राज्य सरकारने वेळोवेळी बैठका घेऊन संपाची दखल घेत कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

यामध्ये एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता १२ टक्क्यावरून २८ % करण्यात आला, घरभाडे भत्ता ७ %, १४ % २१ % वरुन ८ %, १६ % आणि २४% टक्के करण्यात आला तसेच कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये सेवाकालावधीनुसार रुपये ५०००, रुपये ४००० व रुपये २५०० .../२

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने सिडकोच्या संचालक मंडळाची पाणी प्रश्नासाठी घेतली भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाणी प्रश्नावरील आंदोलनाची सिडकोने दखल घेत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे व मुख्य अभियंता दायातकर व अधिक्षक अभियंता मूल यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने बैठक घेवून पाणी प्रश्नासंदर्भात विचारणा केली.

यावेळी सुदाम पाटील सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस, ताहीर पटेल जिल्हा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस, सौ शशिकला सिह जिल्हा कार्याध्यक्षा महिला राष्ट्रवादी काँग्रेस, बळीराम नेटके शहर अध्यक्ष खारघर,सौ विद्या चव्हाण उपाध्यक्ष महिला, कासम मुलानी जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस, सौ संगीता पवार महिला अध्यक्ष कामोठे राष्ट्रवादी काँग्रेस, नितीन म्हात्रे युवा कार्याध्यक्ष, इलियास भाई शेख, पवार यांची पाणी टंचाई प्रश्न प्रकरणी विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली त्यामध्ये प्रामुख्याने ज्या सोसायटी मध्ये पाणी नाही त्यांना तात्काळ टँकरने पाणी देणे,जिथे पाणी चोरी होत असेल त्यास आळा घालणे,पंप लावून पाणी ओढणाऱ्या सोसायटी वर कारवाई करणे आदी मागण्या मांडण्यात आल्या. या मागण्यांची सिडकोने दखल घेत लवकरच हेल्पलाईन सुरु करण्यासाठी अधिकारी वर्गाला शिंदे यांनी सूचना केल्या जेणेकरून पाण्या संदर्भात असणाऱ्या तक्रारी त्या हेल्पलाईन वर नोंद होतील. लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढाकाराने सर्वांना पाणी मिळणार असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.२३१३ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.४८, भूखंड क्र.१२७ ऐ, क्षेत्र १५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड मेसर्स साची डेव्हलोपर्स तर्फे भागीदार १) श्री.संदीप दिलीप थळे, रा.मुळेखंड, तेलिपाडा, ता.उरण, जि.रायगड २) श्री.गॅस जसिम इस्माईल, रा.कोळीवाडा, उरण, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीचा व ताबेकब्जातील भूखंड आहे.

मेसर्स साची डेव्हलोपर्स तर्फे भागीदार १) श्री.संदीप दिलीप थळे २) श्री.गॅस जसिम इस्माईल यांनी त्यांचे मालकीचा मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.४८, भूखंड क्र.१२७ ऐ, क्षेत्र १५० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा सौ.सुशिला प्रभाकर म्हात्रे रा : सी ६/७/०-२/से-१८ सिडको कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधानातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि सौ.सुशिला प्रभाकर म्हात्रे रा : सी ६/७/०-२/से-१८ सिडको कॉलनी, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.२६/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.,**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**

## जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सिडको संचिका क्र.७३४ प्रमाणे मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५६, भूखंड क्र.२०४, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड श्री.किसन नारायण पाटील उर्फ किसन नारायण कोळी रा.घर क्र.२०६ क, कुंडेगाव, पो.जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीची व ताबेकब्जातील भूखंड आहे.

श्री.किसन नारायण पाटील उर्फ किसन नारायण कोळी यांनी त्यांचे मालकीचा मौजे : द्रोणागिरी नोड येथे सेक्टर क्र.५६, भूखंड क्र.२०४, क्षेत्र ४० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा श्री.संदीप दिलीप थळे रा.मुळेखंड / तेलीपाडा, ता.उरण, जि.रायगड यांस कायमस्वरुपी विक्री करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि श्री.संदीप दिलीप थळे रा.मुळेखंड/तेलीपाडा, ता.उरण, जि.रायगड हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल.

दि.२६/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अर्पा.,**
**उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**


# महिला बचत गटांसाठी मसाले प्रॉडक्ट्स ट्रेनिंग संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर मधील मौजे मोठी चांधई येथे आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठान मार्फत महिला बचत गटांसाठी मसाले प्रॉडक्ट्स ट्रेनिंग संपन्न झाले.

आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठित मार्फत ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर मधील मौजे मोठी चांधई येथे महिला बचतगट सक्षम आणि स्वावलंबी होण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन अंशु अभिषेक, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड.संपत हडप, यांच्या पुढाकाराने व प्रयत्नातून महिला बचतगटांसाठी मसाले प्रॉडक्ट्स ट्रेनिंग ग्रामपंचायत विभागातील चांधई येथे संपन्न झाला. यात प्रामुख्याने मिरची मसाला, मीठ मसाला, सांबर मसाला, पावभाजी मसाला, चहा मसाला, चिकन मसाला, बिर्याणी मसाला, गरम मसाला, भाजी मसाला, चाट मसाला इत्यादी शिकवण्यात आले.



या संस्थेचा मुख्य उद्देश सामाजिक व धार्मिक कार्य करणे हा असून बाळ आश्रमाचे बांधकाम (विनामूल्य शिक्षण व वसतिगृहाची व्यवस्था), बेरोजगार, गरीब, असहाय्य महिलांना प्रशिक्षित करून लघुउद्योगाद्वारे रोजगार उपलब्ध करून देणे हा असून कर्जत तालुक्यातील विविध ग्रामपंचायत विभागात ते यासाठी प्रशिक्षण शिबीर घेत आहेत. महिलांना आपल्या पायावर खंबीरपणे उभे करण्याचे महत्वपूर्ण काम सध्या या संस्थेच्या मार्फत सुरू आहे. सदरचा शिबीर संपन्न होत असतांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन अंशु अभिषेक, शिवसेना तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, युवासेना कर्जत तालुका सचिव ॲड.संपत पांडुरंग हडप, रा.जि.प. सदस्या सहारा कोळंबे, सरपंच प्रमिला मोहिते, उपसरपंच दीपा कोळंबे, जेष्ठ समाजसेवक माधव कोळंबे, पांडुरंग बागडे, किरण कोळंबे, रंजना कोळंबे, रुपाली कोळंबे, ट्रेनर सुनीता प्रभू देगिणाळ, महिला बचतगट सी.आर.पी. योगिता कोळंबे, ग्रामसंघाच्या सर्व महिला व दोन्ही चांधई येथिल सर्व महिला बचत गटाच्या महिला या कार्यक्रमात उपस्थित होत्या.

महिलांना सक्षम करण्यासाठी आणि स्वावलंबी बनवण्यासाठी महत्वपूर्ण असणारी ट्रेनिंग ग्रुप ग्रामपंचायत नसरापूर मधील मोठी चांधई येथे विविध ठिकाणी सुरू आहे.

# समन्वय आणि पुनर्विलोकन समितीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत राऊत

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुका स्तरावर तालुका समन्वय व पुनर्विलोकन समिती स्थापन करणेबाबत शासनाने सुचना दिल्या आहेत त्यानुसार तळा तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीवर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी सदर नेमणुकीबाबत शिफारस करुन नियुक्ती करण्याचे निर्देश दिले होते त्यानुसार तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीच्या अध्यक्षपदी तळा तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत राऊत यांची निवड करण्यात आली आहे.

महाआघाडी सरकार स्थापन होऊन आज अडीच वर्षाचा कालावधी लोटून गेला आहे समितीची निवड करण्यासाठी उशीर झाला असला तरी रायगडच्या पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांची जिल्ह्यासाठी झोकुन काम करण्याच्या पध्दतीने या समितीकडून देखील अपेक्षा वाढल्या आहेत.तळा पंचायत समिती मध्ये सध्या प्रशासकाची नेमणूक करण्यात आली आहे या पूर्वीची पाच वर्षे ही मनमानी कारभारात गेली. लोकप्रतिनिधींचा अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर वचक नाही विकासकामांच्या बाबतीत अधिकाऱ्यांच्या संगनमताने ठेकेदारांची हुकुमशाही सुरु असून निकृष्ट दर्जाचे कामे तालुक्यात होत आहेत कारण त्यांच्यावर कोणाचाच जरबच राहिलेला नाही विकासकामे मोठ्या प्रमाणावर होत असली तरी योग्य पद्धतीने व चांगल्या दर्जाची करून घेण्यासाठी जनतेसाठी आणि लोकप्रतिनिधींसाठी समन्वय आणि पुनर्विलोकन समिती चांगले माध्यम असल्यामुळे सत्ताधारी पक्षाचे चंद्रकांत राऊत यांची निवड झाल्यामुळे ते या पदास योग्य न्याय देऊन तालुक्यातील विकासकामांसह शासनाच्या योजना तळा-गळा पर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्न करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तळा तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीच्या अध्यक्षपदी माजी उपसभापती चंद्रकांत राऊत यांची नियुक्ती झाल्याबद्दल तळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नाना भौड तळा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे,युवक शहर अध्यक्ष नागेश लोखंडे,जगदीश शिंदे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.तळा पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी पंडित राठोड यांना दिवसांपूर्वी लाचलुचपत विभागाकडून रंगेहाथ पकडुन अटक करण्यात आली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार थांबवण्याचे मोठे आव्हान नवनिर्वाचित अध्यक्ष यांच्या समोर राहील.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणमध्ये २० मीटर उंचीचे ऐतिहासिक शिवस्मारक पर्यटकांसाठी होणार खुले

निसर्गमय परिसर न्याहाळता येणार आहे. दुसऱ्या मजल्यावर भव्य अशा एक्झीब्युशन हॉलची निर्मिती करण्यात आली आहे. या एक्झीब्युशन हॉलमध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक ऐतिहासिक चित्र, शिल्प, पेंटिंगचे प्रदर्शन लावण्यात आली आहेत. कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या स्वांतत्रवीर सावरकरांच्या शिक्षेच्या प्रसंगाचाही अप्रतिम शिल्प उभारण्यात आले आहे.

त्यानंतर तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर चहुबाजूंनी परिसरातील देखाव्यांची लज्जत घेण्यासाठी विह्यूज गॅलरी आणि महाराजांच्या जीवनपटावर ऑडिओ व्हिज्युअल सिस्टीमची व्यवस्था करण्यात आली आहे. या ऑडिओ व्हिज्युअल मिनी थिएटरमध्ये प्रेक्षकांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. स्टेजच्याच मागे एमपी थिएटर उभारण्यात आले आहे. या ओपन एमपी थिएटरमध्ये २५९ प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे. पाचव्या आणि अखेरच्या मजल्यावर सहा मीटर उंचीचा छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि चार मीटर उंचीचा समर्थ रामदास स्वामी यांचा अष्टधातुंचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे.छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या भेटीवर आधारित उभारण्यात आलेल्या या स्मारकाची तळमजल्यापासुन उंची २० मीटर आहे.राज्यातील इतक्या मोठ्या उंचीचे हे एकमेव स्मारक आहे. १७फेब्रुवारी २०१९ रोजी या शिवस्मारकाचे उद्घघाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत दिमाखदार सोहळ्यात आणि लाखो दासभक्तांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरु पाहाणाऱ्या या ऐतिहासिक भव्य दिव्य अशा शिवस्मारकाची विशेषतः दासभक्तांना मोठी उत्कंठा लागून राहिली होती.त्याचेही स्वप्न या निमित्ताने साकार झाले आहे. मात्र कोरोनामुळे हे शिवस्मारक मागील दोन वर्षे पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आले होते. सदर शिवस्मारक पर्यटकांसाठी खुले करण्यात यावे अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी केली होती. कोवीड दरम्यान मागील दोन वर्षांपासून मंदिरे असलेली अनेक संग्रहालय बंद ठेवण्यात आली होती. आता मात्र बंदीचे निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटकांकडून नाममात्र प्रवेश फी आकारणी करीत हे शिवस्मारक येत्या दहा दिवसातच पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार असल्याची माहिती जेएनपीटी वरिष्ठ प्रबंधक तथा सचिव जयंत ढवळे यांनी दिली.

## रोहा नगर पालिकेकडून धडक कारवाई ; २५ कर थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कापले

रुपयांच्यावर थकबाकी रक्कम असणाऱ्या नागरिकांचे सर्वप्रथम नळ कनेक्शन कट करण्याच्या कारवाईला सुरुवात करण्यात आली असून मागील चार दिवसात २५ जणांचे कनेक्शन कट करून त्यांचे पाणी पुरवठा खंडित करण्यात आला आहे. तर भविष्यात १० हजार रुपये थकबाकीदार असलेल्या १००हुन अधिक थकबाकीदारांवर देखील अशीच कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी दिली.

## विविध सुविधा न मिळाल्याने आजपासून त्यांचे कामबंद आंदोलन

बारक्या पवार हे कामगार आजपासून कामबंद करीत आंदोलनावर गेले आहेत.

दरम्यान, कंत्राटी कामगारांच्या तक्रारी लक्षात घेत ठेकेदाराशी दूरध्वनीवरून संपर्क साधून माहितीसाठी घेतली असता, महावितरणचे ठेकेदार मधुप सिंग शगुन म्हणाले की, माझे रोहा व खालापूर, खोपोली या ठिकाणी लेबर सप्लाईचे काम आहे. रोहा डिव्हिजनमधून मला वेळोवेळी बिल मिळते, त्यामुळे रोह्यातील कामगारांना पगार वेळेवर देता येतो. पण खोपोली (खालापूर) डिव्हिजनमधून मला गेल्या तीन महिन्यांपासून महावितरण कंपनीकडून बिल मिळालेले नाही व तसेच माझ्या बँकेच्या खात्यात पैसे नसल्याने मी कामगारांचे पगार करू शकलेलो नाही. खोपोली डिव्हिजनमधून नेहमीच बिल वेळेवर मिळत नाही, यामुळे कामगारांची ओढाताण होते. महावितरण कंपनीने बिल दिले की लवकरच कामगारांना पगार दिले जातील, असेही शगून म्हणाले.

## काँग्रेसचे महागाईच्या विरोधात आंदोलन

या प्रसंगी उपाध्यक्षा आणि सोशल मिडीया प्रमूख अनुपमा चुढ़ा; सरचिटणीस निता शेणॉय; अंजूम तेरवा ; उपाध्यक्षा प्रेमा मॅडम; नसरिंम मॅडम; विनया पाटील; रोशन ठाकुर तसेच म.प्र.म. कॉ सरचिटणीस चंद्रकला नायडू यांची विशेष उपस्थिती होती. सर्व महिला पदाधिकारीनी महागाईच्या विरोधात निषेध व्यक्त केला.

## श्रीवर्धन एसटी कर्मचारी संपावर ठाम ; आता न्यायालयीन निर्णयाकडे लक्ष

येथील गावागावात मिळणारा एसटी प्रवास सुरु करण्यात यावे. अशी मागणी प्रवाशांकडून होत असताना राज्य सरकारच्या त्रिसदस्यीय समितीने एसटी महामंडळाचे विलीनीकरण अशक्य असल्याचा अहवाल दिल्यानंतर सरकारने त्यानुसार भूमिका स्पष्ट केली. मात्र, न्यायालयात संपाप्रकरणी सुनावणी होणार असल्याने ठोस निर्णय होणार, या प्रश्नाच्या उत्तरासाठी एसटीतील संपकऱ्यांसह तालुक्यातील तमाम प्रवाशांच्या नजरा न्यायालयाकडे लागल्या आहेत.

ऑक्टोबर मध्ये एसटी कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या संपात एकूण २५३ पैकी २४५ कर्मचाऱ्यांनी स्पष्ट सहभाग नोंदविला. महिन्याभरात संपकरांची आकडेवारी कमी होताना ७ ते ८ अशी कमी होत गेली. सद्यस्थितीत १५५ कर्मचारी या संपात लढा देत आहेत.

## वाकण- पाली महामार्गावरील जंगली पीर येथे लोखंडी संरक्षण भिंत तुटल्याने प्रवाशांचा जीव टांगणीला

अधिकाऱ्यांना वारंवार तक्रारी करून ही उपाययोजना होताना दिसत नाही. प्रवासीवर्गांच्या सुरक्षितेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे उपाय योजना करण्यात आली नाही, ज्या ठिकाणी अपघात क्षेत्र आहे त्या ठिकाणी एमएसआरडीसीकडून उपाययोजना करण्यात कामचुकारपणा करत असल्याचे दिसून येत आहे. या महामार्गावर अनेक औद्योगिक क्षेत्र, पर्यटन स्थळे, असल्यामुळे या मार्गावरून छोट्या वाहनांपासून अवजड वाहनांपर्यत मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असते. त्यात हा रस्ता अरुंद असल्याने रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. या जंगली पीर जवळील लोखंडी संरक्षण भिंतीचे दुरुस्ती व्हावी अशी मागणी प्रवाशी व वाहनचालक कडुन होत आहे.

## एस.टी.कर्मचाऱ्यांनी ३१ मार्चपर्यंत कामावर रुजू व्हा अन्यथा कठोर कारवाई : उपमुख्यमंत्री

अशी वाढ करण्यात आली. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये साधारणत: रुपये ७००० ते ९००० रुपये वाढ झाली आहे व महामंडळावर दरमहा रुपये ६३ कोटीपेक्षा जादा भार पडला आहे. ही पगारवाढ सातव्या वेतन आयोगाच्या जवळपास आहे. त्यांच्या नोकरीची हमी आणि त्यांचा पगार महिन्याच्या १० तारखेच्या आत देण्याची राज्य सरकारने ग्वाही घेतली आहे.

संप काळात एसटी महामंडळाला कोणतेही उत्पनाचे साधन नसताना कर्मचाऱ्यांना २५०० ते ५००० रुपये दिवाळी भेट म्हणून दिले. यामुळे महामंडळावर सुमारे २४ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडला. कृती समिती संघटनेने केलेल्या सर्व मागण्या मान्य केल्या असतानाही कर्मचारी संपावर ठाम राहिले. हे कामगार वेगवेगळ्या आवाहनाला बळी पडले आहेत. त्यांच्या मनात गैरसमज पसरविले जात आहेत, असे सांगतानाच कामगारांच्या भावनेचा उद्रेक होऊ देऊ नका. संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना कामावर रूजू होण्यास कोणीही बंदी घातलेली नाही. त्यांच्यावरील निलंबन, बडतर्फी, सेवासमाप्ती या सारख्या कारवाया आम्ही मागे घेतल्या आहेत. त्यामुळे ३१ मार्च, २०२२ पर्यंत कर्मचाऱ्यांनी कामावर रूजू व्हावे असं आवाहन ठाकरे सरकारनं केले आहे.

# सुधागड वंचित बहुजन आघाडी तर्फे माजी सैनिक व माजी पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

वंचित बहुजन आघाडी चा तिसरा वर्धापन दिन पाली सुधागड सह राज्यभरात विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून वंचित बहुजन आघाडी सुधागड तालुक्याच्या वतीने माजी सैनिक व माजी पोलीस अधिकारी यांचा नुकताच सन्मान करण्यात आला. परळी येथील पक्षाच्या कार्यालयात हा सन्मान सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमास पक्षाचे रायगड जिल्हा महासचिव सागर भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अमित गायकवाड यांनी सांगितले की भारतीय सैनिक व पोलीस अधिकारी हे आपल्या जीवावर उदार होऊन सर्व जनतेचे रक्षण करीत असतात. त्यांनी केलेल्या कामाचे ऋण फेडणे जरी शक्य नसले तरी आम्ही त्यांचा सन्मान करून ते फेडण्याचा छोटासा प्रयत्न करीत आहोत. तसेच येणाऱ्या निवडणूकीत वंचित बहुजन आघाडी आपला जलवा दाखवून देणार असल्याचा विश्वास देखील गायकवाड यांनी व्यक्त केला. यावेळी तालुका अध्यक्ष अमित गायकवाड, सचिव आनंद जाधव, रायगड जिल्हा सचिव अशोक वाघमारे, मंगेश वाघमारे, नारायण जाधव, युवक अध्यक्ष राहुल गायकवाड, चंद्रकांत जगताप, भागवत गायकवाड, भरत यादव, अमित जाधव, प्रशांत जाधव, मारूती साळुंखे यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.


## Government of Maharashtra
## Range Forest Office Phansad (Wildlife) Sanctuary

At.New Mazgaon (Kasgaon), Post-Mazgaon, Tal-Murud-Janjira, Dist-Raigad
Email : rfophansad@gmail.com

## Tender Notice No.06/2021-22

**Range Forest Officer-Phansad (Wildlife) Sanctuary invites proposals from interested Civil Contractors to participate in the competitive bidding process of B-1 & A-1 Tendering to-**

| Sr.No. | Work Description | Work Cost |
|---|---|---|
| 1 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =10 Nos. + Class-II=20 Nos) on the boundary of Comptt. No.683, 684 of Usaroli | 160765/- |
| 2 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =07 Nos. + Class-II=18 Nos) on the boundary of Comptt. No.679, 680 of Vandre | 131766/- |
| 3 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =07 Nos. + Class-II=25 Nos) on the boundary of Comptt. No.674, 675, 677 of Vihoor | 158262/- |
| 4 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =03 Nos. + Class-II=09 Nos) on the boundary of Comptt. No.678 of Velaste | 54907/- |
| 5 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =10 Nos. + Class-II=30 Nos) on the boundary of Comptt. No.686, 687, 688 of Danda | 209783/- |
| 6 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =05 Nos. + Class-II=10 Nos) on the boundary of Comptt. No.689, 690 of Sarva | 82214/- |
| 7 | Providing and erecting Cement Concrete boundary pillars (Class-I =09 Nos. + Class-II=37 Nos) on the boundary of Comptt. No.692, 701 of Supegaon | 227613/- |

submission on B-1 and A-1 Tender from would be offline and the deadline to submit the proposals is 31/03/2022 at 5.00 PM. only.

(Blank B-1 and A-1 Tenders forms are available at Range Forest office Phansad for Rs.250/- and Rs.200/- each (12% GST Extra) From 10.00 AM On 26/03/2022 to 31/03/2022 up to 3:00 PM.)

**Sd/-**
**Range Forest Officer**
**Phansad (Wildlife) Sanctuary**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## संजय गांधी नगर येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

गेली अनेक वर्षापासुन चालत आलेल्या श्री. साती आसरा देवीच्या उत्सवाच्या निमित्ताने तसेच सद्गुरु स्वामी गणेश महाराज यांच्या कृपा आशिर्वादाने व सद्गुरु स्वामी हरिचंद्र महाराज यांच्या मार्गदर्शनाने व श्री गणेश सत्संग मंडळाच्या सौजन्याने सालाबाद प्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या ९ व्या व १२ व्या अध्यायाचे पारायण व यनिमित्ताने हरिपाठ, प्रवचन, किर्तन, भजन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार दि.३१/३/२०२२ ते १/४/२०२२ पर्यंत आंबेवाडी नाका येथील संजय गांधी नगर येथे करण्यात येणार आहे.

गुरुवार दि.३१ /३/२०२२ रोजी मंगळविधी कळस स्थापना, माऊली पूजन,गुरु पूजन, ध्वजारोहन, सकाळी १० ते १२ वा. ज्ञानेश्वरीच्या ९व्या व १२ अध्यायाचे पारायण, ५ ते ७ वा. कोलाड विभागयीय वारकरी संप्रदाय यांचा हरिपाठ,रात्री ९ ते ११ वा. ह.भ.प. कैलास महाराज निचिते (आळंदी ) यांचा किर्तन व नंतर जागरण,शुक्रवार दि.१/४/२०२२ रोजी पहाटे ४ ते ६ वा. काकड आरती, सकाळी ९ ते ११ वा. ह.भ.प. विजयानंद महाराज तेलंगे यांचे काल्याचे किर्तन, सायंकाळी ४ वा. दिंडी नगर प्रदक्षिणा, शनिवार दि.२/४/२०२० श्री. सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात येणार असून सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी श्री.गणेश सत्संग ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व तरुण मंडळ,मेहनत घेत असून श्री गणेश सत्संग मंडळ खारपाळे पेण व ३७ शाखा तसेच कोलाड विभाग वारकरी संप्रदाय यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

## तिसे केंद्रस्तरीय शाळा पूर्वतयारी मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील तिसे केंद्रस्तरीय शाळापूर्वतयारी मेळावा प्रा.शाळा तिसे येथे ता.२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

राज्य शासनाने आयोजित केलेल्या शाळापूर्वतयारी केंद्रस्तरीय मेळावा केंद्रप्रमुख श्रीम.चंद्रलेखा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली व तिसे शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष शैलेश लांबे व तिसे शाळा मुख्याध्यापक सहदेव कापसे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या मेळाव्याप्रसंगी वरसगाव शाळेचे मुख्याध्यापक नथुराम ठाकूर,हेटवणे शाळेचे मुख्याध्यापक सचिन मुसळे,तज्ञ मार्गदर्शक व उपक्रमशील आदर्श शिक्षिका श्रीम.श्रद्धा बिरगावले,सोनल पाटील तिसे केंद्रातील सर्व शिक्षक,पालक,ग्रामस्थ व दाखलपात्र विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.

यावेळी प्रथम सत्रात तज्ञ मार्गदर्शिका श्रीम.श्रद्धा बिरगा-वले रा.जि.प.शाळा तिसे यांनी शाळापूर्वतयारी प्रशिक्षणाची संपूर्ण रुपरेषा सांगून उद्दिष्ट सांगितली ,कोरोना काळात विद्यार्थ्यांचा मागिल तीन वर्षाचा झालेला लर्निंग लाँस भरून काढणे,इ.१ लीत दाखल होणार्-या विद्यार्थ्यांची तयारी करणे,शिकविण्यासाठी प्रेरित करण्यासाठी स्वतः साक्षर असलेच पाहिजे हे पालकांना पटवून देणे आदीबाबत मार्गदर्शन केले. तर श्रीम.सोनल पाटील यांनी स्वयंसेवकांचे वेगवेगळे कक्ष तयार करून उपलब्ध शैक्षणिक साधनांचा वापर करुन स्वागत कक्षापासून नियोजन बद्ध विद्यार्थ्यांची क्षमता ठरवण्यासाठी शैक्षणिक कार्ड,साहित्य यांचा वापर करून पालकांचा अभिप्राय घेईपर्यंत संकल्पना स्पष्ट केली.

# पाण्याचे वेळापत्रक बदलले आता लाईन लिकेज मुख्य वाल्वही बदलणार : राजेश मेहता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक तसेच नगरपंचायत मुख्याधिकारी यांच्या सहकार्याने पाणी पूरवठा सभापती सक्रिय झाले असुन माणगांवकरांचे पाणीपूरवठा वेळापत्रकात बदल करुन अनेक वर्षापासून लिकेज वाल्वही लवकरच बदलणार असल्याची माहीती राजेश मेहता यांनी दिली आहे. नगर पंचायत पाणी पूरवठा उतेखोल-भादाव लाईन व आनंदभूवन, खांदाड, बालाजी लाईन वरील मुख्य वाल्व, टाक्या बांधल्या पासुन पहिल्यांदाच बदलण्याचे मोठे काम करण्यात येणार आहे. कारण हे वाल्व मोठ्या प्रमाणात लिकेज असुन पाणी पूरवठा नियोजन करताना पाण्याचा व वेळेचा अपव्यय टाळता येऊन नियोजन सुलभ होईल. अनेक वर्षे या वाल्वची तात्पूरती उपाय योजना देखभाल दुरुस्ती करुन पाणी पूरवठा सुरळीत ठेवण्यात आला. परंतु वेगाने वाढत्या लोकवसाहती व सर्व लाईनला पाणी पूरवठा करताना यंत्रणेवरील वाढता ताण लक्षात घेता. सभापती राजेश मेहता यांनी या सर्व बाबी व समस्या येथिल जाणकार पंप ऑपरेटर व पाणी पूरवठा कर्मचाऱ्यांकडुन जाणुन घेतल्या व प्राधान्याने हे वाल्व बदली करुन नविन किर्लो स्कर कंपनीचे ब्रॅण्डेड वॉल्व आणले असुन नियोजन पूर्वक शटडाऊन घेऊन ते बदलण्यात येणार, यासाठी माणगांवकरांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले.



माणगांवकरांना पुरेसा व सर्वसमावेशक पाणी पूरवठा व्हावा, या उद्देशाने नुकतेच नगरपंचायत पाणी पूरवठा दि. २५ मार्च नविन वेळापत्रका प्रमाणे सुरु करण्यात आला. हा बदल झाल्याने सुरुवातीला सर्वांनाच थोडा त्रास सहन करावा लागेल. पण कोणीही पिण्याचे पाण्यावाचून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली आहे. पाणी पूरवठ्यातील त्रूटी दूर करण्याचे हेतुने हा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या उन्हाळा सुरु झाला असुन नदीचे पाणी पातळीवर येत्या काही दिवसात परिणाम होत असतो, पाणी शेवाळयुक्त पिवळसर असते. अवकाळी पडणारा पाऊस, वादळ, नदीचे प्रदुषण या सर्व गोष्टींचे वास्तव आपल्या सर्वांनाच माहीत आहे. यासाठी या दिवसात पाण्याचा अपव्यय टाळत व पाणी जपून, गाळुन, उकळून पिण्यासाठी वापरावे. लवकरच नदीचे किनारी स्वच्छता करण्यासाठी मुख्याधिकारी यांचेशी संवाद साधुन काही उपाय योजना करावी लागेल? या विषयी प्रयत्न करणार असुन नदीकिनारी असलेली मोठी कॉम्प्लेक्स आणि त्यांचे सांडपाणी योग्य नियोजना बाबत सुचना व जनजागृती केली जाईल.

नगर पंचायतीचा पाणी पूरवठा आवाका हा फार मोठा असुन सर्वचजण त्यासाठी प्रयत्नशिल आहेत. कोणालाही दोष न देता यापूर्वीही नगर पंचायतीचा पाणी पूरवठा सुरळीत होता. पण काही कामे प्राधान्याने करावी लागतीलच, तरच भविष्यात पाण्याची चणचण भासणार नाही. यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत. नुकतेच केलेला, पाणी पूरवठा वेळापत्रक बदल हा त्याचाच एक भाग यामुळे थोडे दिवस नागरिकांचे सहकार्याची अपेक्षा आहे. नविन बदला प्रमाणे पाणी पूरवठा वेळापत्रक पुढील प्रमाणे अनुक्रमे १ विकास कॉलनी लाईन सकाळी साडेचार ते सहा वाजता पाणी सुटेल, क्र.२ भादाव उतेखोल लाईन सकाळी सहा ते आठ, क्र.३ जुने माणगांव लाईन सकाळी आठ ते दूपारी तीन, क्र.४ खांदाड लाईन सकाळी साडे आठ ते दहा वाजता सुटेल यानंतर सकाळी दहा ते साडेअकरा वाजे पर्यंत टाक्या पून्हा भरुन घेणे,

क्र.५ आनंद-भूवन लाईन दूपारी साडे अकरा ते दीडला पाणी सुटेल व पून्हा दीड ते तीन वाजे पर्यंत टाक्या भरुन घेण्यात येतील. क्र.६ ऑफीस लाईन व महालक्ष्मी लाईन दूपारी तीन ते साडेचार, क्र.७ उतेखोलवाडी, तात्या लाईन, विकास कॉलनी भाग दोन लाईनला सायंकाळी साडेचार ते साडेसहा पाणी सुटेल, क्र.८ बालाजी लाईनला सायंकाळी साडेसहा ते रात्री आठ वाजे पर्यंत तर ९ दत्तनगर लाईनला रात्री सव्वानऊ ते पावणे अकरा वाजे पर्यंत पाणी पूरवठा करण्यात येईल. या नंतर पून्हा सर्वच चारही टाक्या पूर्ववत भरण्याचे काम सुरु राहील, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. माणगांवकरांना अहोरात्र पाणी पूरवठा सुरळीत ठेवण्याचे काम येथिल पाणी पूरवठा कर्मचाऱ्यां कडुन सातत्याने होत आहे. काही तांत्रीक अडचणी वगळता, वीज खंडीत वा अन्य लाईन लिकेज देखभाल दुरुस्ती कारण उदभवल्यास वेळा पत्रकात बदल होऊ शकतो, याची सर्वांनी नोंद घ्यावी. असे नगरपंचायत पाणी पूरवठा सभापती राजेश मेहता यांनी आमचेशी वार्तालाप करताना सांगितले आहे.

## मुरुड ग्रामीण रुग्णालयात बारा वर्षावरील मुलांना कोविड लसीकरणास सुरुवात

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात (लेडिकुलसूम बेगम) शहर व आजुबाजूच्या परिसरातील बारा वर्षावरील मुलांना कोविड लसीकरणास सुरुवात करण्यात आली.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे,आधिपरिचारिका निर्मला भोसले, दक्षता चोगले, श्रुतिका कांबळे, सुहास सानप, सायली शिवाजी, श्वेता विरकुड व रुग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यात व तालुक्यात कोविड रोगाचा प्रादुर्भाव कमी झाला असला तरी भविष्यात आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून या आजाराला आळा घालण्यासाठी लहान मुलांना देखील लसीकरण करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मुरुड तालुक्यात बारा वर्षावरील मुलांना कोविड लसीकरणास सुरुवात करण्यात आली आहे.

## गळफास घेवून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. शिवा (पूर्ण नाव माहित नाही) या इसमाने अज्ञात कारणावरुन उलवे सेक्टर २५, प्लॉट नं.४८१ येथील साईटच्या पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेवून आत्महत्या केली आहे. सदर इसमाचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फुट १ इंच, चेहरा अंडाकृती, डोक्यावरील केस काळे आहेत.

# सावधान ! माथेरान तापतेय निसर्गाची सूचक सूचना

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मुंबई पुणे सारख्या शहरांना जवळचे थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरान हे नेहमीच प्रिय राहिलेले आहे अगदी शेवटच्या क्षणी ठरवून निसर्गाचा आनंद घेतां येणारे एकमेव ठिकाण असलेल्या माथेरानला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात गर्मीच्या काहिलीने बेजार झालेले नागरिक माथेरान ला थंडाव्याच्या आडोशाला येत असतात पण मागील काही वर्षांपासून माथेरान चा पारा चढला असून ह्यावर्षी तर प्रथमच माथेरान च्या तापमानाने ३५ च्या वर सातत्याने गर्मीच्या उचांक नोंदविल्याने माथेरान करिता एक धोक्याची सूचना ठरत असून,माथेरान चे थंड हवेचे ठिकाण अशी ओळख पुसून जाण्याअगोदर स्थानिक व प्रशासनाने ह्या विरोधात ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

१८५० साली ब्रिटिशांनी घनदाट जंगलांनी व्यापलेल्या ह्या पर्वताचा शोध लावला ,घनदाट जंगल,थंड हवा अशी ह्या ठिकाणाची खरी ओळख पण नागरिकांचा निसर्गावर सुरू असलेला अत्याचार, प्रचंड प्रमाणात सुरू असलेली वृक्षतोड, नवीन लागवडच नसल्याने घटत चाललेली वनसंपदा, घटत चाललेले पावसाचे प्रमाण व सलग दोन चक्रीवादळांचा तडाख्याने नेस्तनाबूत झालेली वृक्षवल्लीने येथील डोंगर माथा बोडका होत चालला असून त्यात भर म्हणून येथे वाढत असलेली घोड्यांची संख्या व त्यांच्या मलमूत्रामुळे नष्ट होणारी झुडुपे अशी अनेक कारणे समोर येत आहेत पण ह्या निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी मात्र कोणतीही ठोस उपाययोजना मात्र लागू केली जात नसल्याने आगामी काळामध्ये थंड हवेचे ठिकाण अशी ओळखच पुसली जातेय की काय भीती समोर येऊ लागली आहे

माथेरानचे वनसंवर्धसाठी येथे वनविभाग अस्तित्वात आहे व त्यांच्या मार्फत दरवर्षी वृक्षारोपण केले जाते पण त्यातील किती वृक्ष जगतात हा संशोधनाचा विषय आहे तर माथेरानच्या डोंगररांगांमधील वनसंपदा संपत चालली आहे प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झाल्याने डोंगर उघडे पडत चालले आहेत त्यामुळे गर्मी वाढत आहे दररोज अनेक महिला येथून लाकडांचे भारे घेऊन जाताना आढळून येत असतात त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे झाले आहे तसेच माथेरानमध्ये प्रवासी घोड्याना प्रेक्षणीय स्थळांवर बांधण्यासाठी स्टँड उपलब्द नसल्याने हे घोडे झाडांना बांधल्याने अनेक ठिकाणे ही उध्वस्त झाली आहेत माथेरानमधील सर्वच प्रेक्षणीय स्थळांवर हे चित्र पहावयास मिळते तर काहीजणांनी सुरवातीस घोडे बांधण्यासाठी अडविलेल्या जागांवर आता लॉजिंग व्यवसाय सुरू केला असून घोडे मात्र जंगलात बांधण्यास सुरवात केली आहे त्याचा परिणाम ही दिसू लागला आहे , चक्रीवादळात माथेरान मध्ये शेकडो झाडे पडली आहेत त्याचे अवशेष ही अजून ही पहावयास मिळतात पण त्याविरुद्ध नवीन लागवड मात्र दिसून येत नाही अनेक ठिकाणी जमिनीची धूप झाल्याने माती वाहून जात आहे व परिणामी झाडांची मूळे उघडी पडत आहेत त्याचेही संवर्धन होणे गरजेचे झाले आहे अशा प्रकारची अनेक कारणे समोर येत आहेत नागरिकच निसर्गाला ओरबडत असल्याने येणाऱ्या पिढीसाठी मात्र माथेरान ची थंड हवा राहील की नाही अशी शंका येऊ लागली असून स्वतःचा व्यवसाय व माथेरान ची खरी ओळख टिकवायची असेल तर आता नागरिकांनी पुढाकार घेऊन वनसंवर्धन चे महत्व लक्षात घेऊन शासनाचे गंभीर रित्या लक्ष वेधण्याची गरज निर्माण झाली आहे




### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.पांडे साहेब

**अर्जदारातर्फे ॲड.मंगेश एम. भोंडकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.३९७/२०२२
ने.ता.०५/०५/२०२२

श्री.धावजी महादेव मोकल
वय : ७६ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.साई, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुपग्रामपंचायत साई, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.महादू गोसावी मोकल यांचा मृत्यू दि.१०/०६/१९७५ रोजी मु.पो. साई, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. आणि अर्जदार यांचे वडील कै.हरिभाऊ सावळाराम यादव यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.महादू गोसावी मोकल वर नमूद ठिकाणी मयत झालेली आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाचीही हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून ३० दिवसांचे मुदतीत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२५ माहे ०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे सो.कोर्ट

**ॲड.रेखा होवाळे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया.व.स्तर यांचे समोर
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज

अर्ज नं.३१७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०४/२०२२

१) रमा महादेव जाधव
वय : ५४, धंदा : घरकाम
२) मयुर महादेव जाधव
वय : ३६, धंदा : नोकरी
रा.घर क्र.४, बिल्डींग क्र.६, के.एल.५,
से.०२, कळंबोली, पनवेल-४१०२१८ अर्जदार

ज्यापेक्षा कै.महादेव धाकू जाधव ह्यांचा मृत्यू दि.१७/१०/२०२१ मुंबई येथे झाला. अर्जदार क्र.१ ह्या कै.महादेव धाकू जाधव यांच्या पत्नी व अर्जदार क्र.२ हा मुलगा आहे आणि त्यांचे वारसाने खालील मिळकतीबद्दल वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**Name of the Property Holder : Late Mahadev Dhaku Jadhav**

**Apartment No.KL-5/6/0:4, Sector-2, admeasuring area 33.21 Sq. Mtrs., Built-up, Kalamboli, Taluka Panvel, Dist-Raigad.**

**Agreement value Rs.1,65,000/- (Rupees One Lakhs Sixty Five Thousands only)**

यासाठी वारस दाखला मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख २६ माहे ३ सन २०२२ बेलिफाकडे

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

दिवाणी अ १५० म

**अर्जदारातर्फे ॲड.बी.एन.शेळके**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.श्री.भाकरे, सह दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

चौ.अर्ज नं.७३६/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०६/२०२२

श्री.सुरेश प्रेमसिंग ठाकूर
विरुद्ध
कोणीही नाही

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार सुरेश प्रेमसिंग ठाकूर हे मयत लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर यांचा मुलगा आहे. लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर यांचे दि.२९/०५/२०१९ रोजी निधन झाले असून ते रा.खारघर, नवी मुंबई, नेरुळ, नवी मुंबई येथील रहिवासी होते. कायद्यातील तरतुदीनुसार मयत लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

मयत लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर हे हयात असताना त्यांच्या ५०% टक्के मालकी हक्कातील व ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.४०३, ४ था मजला, मंगल सदन बिल्डींग,**
**प्लॉट नं.२२६, सेक्टर-१७, उलवे, ता.पनवेल,**
**जि.रायगड. क्षेत्र १८.४३४ चौ.मी.**
**ही मिळकत ह्या अर्जाचा विषय आहे.**

वर वर्णन केलेली मिळकत मयत लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावे व्हावे याकरिता आवश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत मयत लक्ष्मी प्रेमसिंग ठाकूर यांच्या कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या वारस दाखल्याचे कामी कोणत्याही व कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात पुराव्यासह हजर राहून कायदेशीररित्या हरकती नोंद कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आज दि.२६/०३/२०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Smt.J.Madhuri Anand Court

Adv. V. A. Mathew
Adv. Somnath M. Gaikwad

### PUBLICT NOTICE

IN THE COURT OF DISTRICT and Addl.Sessions, Panvel Dist-Riagad, Panvel
DIVORCE PETITION No.3 OF 2022

Mrs.Jagulin Joseph
Residing at Flat 502, B Wing,
Black Smith Corner, Plot 1, Sector 13,
Kalmboli, raigad (Dist.)
Maharashtra-410218 Petitioner No.1
And
Mr.Chacko Anthony @ Chaco, Koovaparambil
Residing at B. 27, Nandivali, Haji Malang Road,
Kalyan (E) Thane (Dist.) Petitioner No.2

MEMORANDUM OF PETITION FOR DIVORCE BY MUTUAL CONSENT U/S 10 (A) OF THE DIVORCE ACT,

Whereas the above named petitioners have mutually filed a petition for mutual consent divorce under Divorce Act, 10 (A) as the petitioners herein realized that their likings, tastes of life, temperaments, ideas, ideologies, thinks etc., are different. This made them impossible to live together as husband and wife hence this petition is filed.

The said petition is filed without collusion or connivance- with each other. The petitioners are making this public proclamation to wave of the cooling off period of six months as permitted by law. You the member of Public are hereby given notice to appear before in the Court of District Judge-2 and Addl. Sessions judge Panvel, Dist. Raigad. In person or by pleader duly instructed to file your say / objection if any within 30 days from the date of publiction of this public Notice, failling which this petition will be held presuming that there is no objection from anybody for granting the mutual consent divorce and petition will be finally decided.

Given under my hand and seal on this day of 20 March 2022

Sd/- Judicial Clerk Civil Court Panvel Dist-Raigad | Court Seal | Sd/- Supritendt. Civil Court Panvel Dist-Raigad

Hon'ble Godase Madam

Advocate Dr.Suneet Gupta

### PUBLICT NOTICE

BEFORE THE HON'BLE CIVIL JUDGE (SENIOR DISVION) OF PANVEL
Miscellaneous Civil Application No.1659 of 2021
Exh : 7/D
Next Date : 21/04/2022

Petition for Letters of Administration to the property and credits of smt. Kumkum Gupta, Occupation Housewife, Hindu, Indian Inhabitant, who was residing at the time of her death at Flat No.504, Building 'H', Rail Vihar CHSL, Plot No.01, Sector-04, Kharghar, Navi Mumbai-410210 Deceased.

Anuroop Gupta
Age 47 years, Occ. Sevrice
an Adult Hindu, Indian Inhabitant,
Residing at Flat No.504, Building 'H',
Rail Vihar CHSL, Plot No.01.
Sector-04, Kharghar, Navi Mumbai-410210
Son of the Deceased above-named Applicant

The Public is hereby informed that the Applicant in the above Miscellaneous Application before the Hon'ble Civil Judge (SD) at Panvel is a Class 1 Legal Heir of the late Smt Kumkkum Gupta, who was residing at the time of her death at, Flat No.504, Building 'H', Rail Vihar CHSL, Plot No.01, Sector-04, Kharghar, Navi Mumbai-410210 and who expired on 01 May 2021.

The self acquired property of the late Smt Kumkum Gupta is provided in Schedule I of the Application filed by the Applicant before the Hon'ble Court.

The Applicant has filed the above Miscellaneous Application before the Hon'ble Civil Judge (SD) at Panvel to be declared the Administrator of the Estate of the late Smt Kumkum Gupta and to be granted a Letters of Administration in respect of her Estate.

The Public is hereby informed that any person who has any objection to the grant of the above Application is hereby directed to immediately approach the Hon'ble Civil Judge (SD) at Panvel and place his or her objection before the Court within 30 days of the publiction of this notice, failing which no objections to the above Application shall be enterained by the Hon'ble Court and the Applicant shall be granted a Letters of Adminisitration in respect of the Estate the late Smt Kumkum Gupta.

Sd/- Jr. Clerk Civil Court Panvel | Court Seal | Sd/- Ass.Supritendt. Civil Court Panvel

# वाढीव मालमत्ता कराविरुद्ध खारघरमध्ये उपोषणाचे हत्यार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेने लादलेल्या वाढीव मालमत्ता कराला नागरिकांचा विरोध वाढू लागलेला असतांनाच आता यासंदर्भातील आरपारची लढाई म्हणून असहकार चळवळ कॉलनी फोरमने सुरू केली आहे. व त्याचाच एक भाग म्हणून कॉलनी फोरमच्या अध्यक्षा आणि नगरसेविका लीना गरड यांनी वाढीव मालमत्ता करा विरोधात उपोषणाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रविवार दि.२७ मार्च रोजी खारघर से १२ नवरंग चौकात या ठिकाणी उपोषण आंदोलन सकाळी ११ वाजता सुरू होणार आहे.

याविषयी माहिती देतांना नगरसेविका लीना गरड म्हणाल्या की, पनवेलकर नागरिकांच्या माथी मारलेल्या व वसूल केल्या जाणाऱ्या अवाजवी, बेकायदेशीर, डबल मालमत्ता करा बाबत यापूर्वीही आवाज उठविला गेला आहे, वारंवार महासभेत हा विषय मांडण्यासह सूचनाही केल्या. मात्र प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करीत आहे. माझ्या मार्फत दिल्या जाणाऱ्या कुठलाही विषय आजवर पटलावर घेण्यात आला नाही. दि.२४ मार्च रोजी मालमत्ता कराची लक्षवेधी सुद्धा टाळण्यात आली. याचे नेमके कारण काय ? जनतेला अंधारात का ठेवले जात आहे असा सवालही त्यांनी केला. त्यामुळे आता लढाई आरपारची असून कॉलनी फोरम सदरचा हा मालमत्ता कर रद्द केल्याशिवाय थांबणार नाही असे म्हणत आम्ही असहकार चळवळ सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कामोठे, खारघर येथे कॉलनी फोरमचे समनव्यक आणि कार्यकर्ते उपोषण करणार आहेत. त्यात कॉलनी मधील नागरिकांनी सुद्धा फोरमला पाठिंबा देत आंदोलनात सहभागी होत असल्याचे आश्वासन दिले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पनवेल मनपाकडे यापूर्वी त्यांनी, अवाजवी मालमत्ता कराचा ३८% दर कमी करून ३०% करणे, ३८% मधील १२ टक्केचा दुहेरी कर वजा करणे, मागील पाच वर्षाचा सिडको कॉलनी एरिया मधून सेवाकर सिडकोला भरलेला असल्यामुळे पूर्वलक्षी प्रभावाने लावलेला मालमत्ता कर रद्द करणे, मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिकेप्रमाणे पनवेल महानगरपालिकेमधीलही ५०० चौरस फुटांपेक्षा लहान घरांचा मालमत्ता कर रद्द करावा व महानगर पालिका अधिनियम कलम १२९ – अन्वये गावांना जो फायदा दिला, तो फायदा सिडको कॉलनी वसाहतीमधील मालमत्ताधारकांना देणे अशा प्रमुख पाच मागण्या वारंवार केल्या आहेत.

मात्र या मागण्यांकडे प्रशासनाने सपशेल दुर्लक्ष केले आहे. उपरोक्त सर्व मुद्द्यांचा अधिकार महापालिकेमधील सत्ताधारी आणि प्रशासन यांना असतांना केवळ टोलवाटोलवी करून जनतेला नाहक तणावात ठेवले जाते. मागील तीन महासभेमध्ये हे ठराव पटलावर घेण्यासाठी आणि मंजूर करण्यासाठी आपण आवाज उठवत आहोत. मात्र तरीसुद्धा सत्ताधारी आणि प्रशासन यांच्या असलेल्या अभद्र युतीमुळे सदरचे ठराव पटलावर येत नाहीत आणि मंजुरी होत नाहीत असे टिकास्त्रही त्यांनी यावेळी सोडले. दरम्यान, विधिमंडळामध्ये नगर विकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी स्पष्ट केलेले आहे की, सर्व अधिकार कायद्याद्वारे महासभा आणि सत्ताधारी आणि प्रशासनाला आयुक्तांना दिले आहेत. मात्र जोपर्यंत हे ठराव मंजूर होत नाही, तोपर्यंत आंदोलन चालूच राहील आणि त्यासाठी सत्ताधाऱ्यांना प्रशासनाला जाग यावी म्हणून दोन दिवसाचे लाक्षणिक उपोषण करत असल्याचे नगरसेविका लीना गरड यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### श्री साईबाबा मंदिर पनवेल येथे प्रथमच श्री रामकथेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

परमपुज्य सदगुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आर्शिवादाने पनवेल येथील श्री साई बाबा मंदिर येथे श्री रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून प्रथमच श्री रामकथा (श्री रामचरित्र मानस पाठ) चे आयोजन शनिवार २ एप्रिल ते १० एप्रिल २०२२ रोजी दरम्यान होणार आहे. सदर श्री रामकथा पुज्य श्री दिव्यांशु महाराज –अयोध्या हे सादर करणार आहेत. या निमीत्ताने यज्ञ व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री साई नारायण बाबा आश्रमव श्री भगवती साई संस्थान(रजि.)पनवेल चे चेअरमन खेमचंद गोपलानी, को–ऑडरीनेटर रामथदानी व सचिव रामलाल चौधरी यांनी दिली आहे. तरी सर्व भाविकांनी या श्री रामकथेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### क्रेडीट कार्ड धारकाच्या खात्यातून १ लाखाची खरेदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एसबीआय बँकेतून बोलत असल्याचे भासवून एका सायबर चोरट्याने गोवंडी येथे राहणार्या व्यक्तीला बोलण्यात गुंतवून त्याच्या क्रेडीट कार्डमधून १ लाख रुपयांची खरेदी करुन त्याची फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील अनोळखी सायबर चोरट्याविरोधात फसवणूकीसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. या प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव मनोज राठोड असे असून तो गोंवडी येथे राहण्यास आहे. याचवेळी एसबीआय बँकेच्या प्रतिनिधीने मनोजला संपर्क साधुन त्याच्या क्रेडीट कार्डवरुन झालेल्या १ लाख रुपयांच्या व्यवहाराबाबत त्याच्याकडे विचारणा केली. यावेळी मनोजने कुठल्याही प्रकारची खरेदी केली नसल्याचे सांगून सदरचा व्यवहार रद्द करण्यास सांगितले. मात्र तोपर्यंत सदरचा व्यवहार पुर्ण झाल्याने मनोजच्या क्रेडीट कार्ड मध्ये १ लाख रुपये गेल्याचा मेसेज त्याला प्राप्त झाला. त्यानंतर मनोजने आ–पले क्रेडीट कार्ड ब्लॉक करुन खारघर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.



## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा विषयक कार्यशाळा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील पुरवठा विषयक बाबींसंदर्भात रास्त भाव धान्य दुकानदार, पेट्रोल पंप व डिझेल पंपधारक, एल.पी.जी. गॅस वितरक, खाद्यतेल व खाद्यतेलबियांचे व्यापारी, शिवभोजन केंद्र चालक/मालक, ऑईल कंपन्यांचे जिल्हा संघटक व असिस्टंट मॅनेजर, तालुका पुरवठा शाखेतील अधिकारी–कर्मचारी यांची आज दि.२५ मार्च २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.मधुकर बोडके यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळा संपन्न झाली.



या कार्यशाळेमध्ये उप नियंत्रक, वैधमापन शास्त्र श्री.राम राठोड, अन्न व औषध प्रशासन विभाग, रायगडचे सहाय्यक आयुक्त श्री.लक्ष्मण दराडे, भारत पेट्रोलियम गैस कंपनीचे मॅनेजर श्री.विशाल काबरा, आय.ओ.सी. कंपनीचे श्री.मणिकंदन मुरलीधरण यांनी मार्गदशन केले. तर रायगड जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेचे कार्याध्यक्ष श्री.शेखर देशमुख, पेट्रोल पंप धारक श्री.बाळकृष्ण पाटील, शिवभोजन केंद्र चालक श्रीमती जेधे, रास्त भाव धान्य दुकानदार, सुधागड तालुका अध्यक्ष श्री.हरिश्चंद्र पाटील, रास्त भाव धान्य दुकानदार श्री.कौस्तुभ जोशी व श्री.अच्युत आपटे व माणगाव पुरवठा निरिक्षण अधिकारी श्री.संजय माने यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.गाविद वाकडे यांनी केले. तर जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.मधुकर बोडके यांनी पुरवठा विषयक बाबीचे मार्गदर्शन केले तसेच आगामी काळात शासनाकडून सीएससी सेंटरच्या माध्यमातून राज्यातील रास्त भाव दुकानदार बँकांचे सर्व व्यवहार, रेल्वे विमान तिकिट बुकींग, सर्व प्रकारचे बिल्स उदा.लाईट बिल, फोन बिल, पाणी बिल, हेल्थ केअर सर्व्हिसेस, मोबाईल डीटीएच रिचार्ज, शेती विषयक सर्व सेवा, इन्कम टॅक्स रिटर्न भरणे, नवीन रेशन कार्ड, दुबार रेशन कार्ड, नावामध्ये दुरुस्ती अर्ज इत्यादी सेवा देऊ शकतील. राज्यातील रास्त भाव दुकानदारांचे आर्थिक स्त्रोत वाढविण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासनाने उचललेले हे महत्वाचे पाऊल आहे. विविध शासकीय सेवा पुरविता येणार असल्याबाबत सांगितले.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या बैठकीमध्ये विविध कार्यक्रमाचे नियोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची कोअर कमिटीची बैठक नुकतीच संपन्न होवून या बैठकीत विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरिता स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक पक्ष कार्यालयात पार पडली. या बैठकीमध्ये रिपब्लिकन नेते भाई संगारे यांचा स्मृतीदिन १ एप्रिल रोजी साजरा करण्याचे ठरविण्यात आले. तसेच ८ एप्रिल रोजी पक्षाचे प्रमुख मनोजभाई संसारे यांचा वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे १० एप्रिल रोजी महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे कोरोना काळात ज्या भीमगीत गायकांचे व संगीतकारांचे दुःखद निधन झाले आहे अशा महाराष्ट्रातील सर्व गायक संगीतकारांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम नियोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी यावेळी दिली. दि.१४ एप्रिल रोजी वडाळा ते दादर चैत्यभूमी अशी भव्य रॅली महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत होणार आहे, असे नियोजित करण्यात आले आहे. या बैठकीला जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्यासह बाळाराम जाधव, विजय धोत्रे, सागर संसारे, महिला आघाडी, युवा आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## पेण फेस्टिवलचे शानदार उद्घाटन

## पेण फेस्टिवलला जिल्हास्तरीय स्वरूप प्राप्त : प्रीतम पाटील




**दै.रायगड नगरी । पेण**

देशावर आलेल्या कोरोनाच्या संकटातील अडीच वर्षानंतर पहिल्यांदाच पेण मध्ये जाहीर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेली १३ वर्ष मनोरंजनाचे रेलचेल असलेल्या पेण फेस्टिव्हलला जिल्ह्यातून उत्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या पेण फेस्टिव्हलला रायगड जिल्हास्तरीय स्वरूप प्राप्त झाले असल्याचे प्रतिपादन पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांनी व्यक्त करत पेण फेस्टिवल उत्तरोत्तर प्रगती करेल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी महिलांसाठी झालेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमात पौर्णिमा प्रधान यांनी पैठणी जिंकली.

स्वररंग पेणने आयोजित केलेल्या पेण फेस्टिव्हल २०२१–२२ चा शुभारंभ मोठया उत्साहात करण्यात आला. पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते व माजी विरोधी पक्ष नेते वैकुंठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या फेस्टिव्हलचे उदघाटन करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, खजिनदार भारती साळवी, मनसे तालुका अध्यक्ष रुपेश पाटील, हिमांशू कोठारी, सारिका पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, सविता हांडे, अनिकेत साळवी, अनिरुध्द पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी बोलताना सांगितले की, ग्रामीण भागातील जत्रेतून जसा आनंद मिळतो तसा आनंद या पेण फेस्टिवल मधून मिळत असून छोट्या व्यावसायिकांना तसेच कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळून त्यांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. मिस्टर रायगड, मिस रायगड, रॅम्प ऑक, फॅशन शोच्या माध्यमातून अनेकांचे भवितव्य घडले आहे. १३ वर्ष पेण फेस्टिवलचे यशस्वी आयोजन करून सातत्य राखल्याबद्दल त्यांनी स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी यांचे कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले.

यावेळी सविता हांडे यांनी सादर केलेल्या होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेत महिलांनी सुंदर खेळ सादर करून फेस्टिव्हलची शोभा वाढविली. या स्पर्धेत पौर्णिमा प्रधान यांनी प्रथम क्रमांक, दर्पणा पाटील यांनी द्वितीय क्रमांक तर दीपा पित्रोडा यांनी तृतीय क्रमांक पटकावत पैठणी जिंकल्या. तर लकी ड्रॉ रुपाली वाणी यांनी जिंकला. सर्व विजेत्यांना निकिता साडीज कडून मान्यवरांच्या हस्ते पैठणी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौस्तुभ भिडे तर आभार प्रदर्शन अक्षता साळवी यांनी केले.

स्वररंग पेण आयोजित, स्वररंग इंटरटेन्मेंट व साज मराठी मीडिया पार्टनरच्या समवेत नगरपालिका मैदानावर १२ दिवस रोज सायंकाळी ५ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत हे फेस्टिव्हल भरविण्यात आले असून यामध्ये विविध खाद्यपदार्थ, गृहोपयोगी वस्तू, मनोरंजन साधने, महिलांसाठी शृंगारिक प्रसाधने, खेळांची साधने आदी दुकाने तसेच मनोरंजन कार्यक्रम व विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असल्याची माहिती यावेळी अध्यक्ष राजेंद्र साळवी यांनी दिली.

## प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून देत पक्षासाठी कामे करावी : महेंद्रशेठ घरत



**दै.रायगड नगरी । माथेरान**

आगामी निवडणुका लक्षात घेऊन काँग्रेस पक्षाला बळकटी मिळण्यासाठी भारतीय काँग्रेस पक्षाचे डिजिटल सदस्य नोंदणी उपक्रमास रायगड जिल्ह्यातुन भरभरून प्रतिसाद मिळत आहे जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांनी किमान एक हजार सदस्यांची नोंदणी करणे आवश्यक आहे यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून देत पक्षासाठी कामे करावी असे प्रतिपादन रायगड जिल्हा काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी केले.

शेलू येथील सरपंच शिवाजी खारीक यांच्या फार्म हाऊसवर सायंकाळी सहा वाजता आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महेंद्र शेठ घरत यांचा शिवाजी खारीक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर रायगड जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, तालुका अध्यक्ष मुकेश सुर्वे, रिजाय बुबेरे, प्रमोद राईलकर, शिवाजी सुपे, माथेरानचे माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, संतोष लखन,चंद्रकांत मांडे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महेंद्र शेठ घरत पुढे म्हणाले की, कार्यकर्त्यांनी नेटाने कामाला लागले पाहिजे यावेळी नक्कीच आपले दोन आमदार आगामी काळात निवडून देण्यासाठी आतापासूनच सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत प्रत्येक कार्यकर्ता हा आपला घरातील सदस्य असून इथे माझ्यासकट सर्वच अध्यक्ष आहेत असे घरत यांनी सांगितले तर डिजिटल नोंदणी करताना नेटवर्किंग बाबतीत अनेक अडचणी निर्माण होत आहेत त्यातून सुध्दा आम्ही आपल्या परीने तालुक्यातुन उच्चांक गाठून देऊ असा विश्वास तालुका अध्यक्ष मुकेश सुर्वे यांनी व्यक्त केला तर जिल्ह्यातील आदिवासी भागातील एक हजार सदस्यांची नोंदणी आम्ही नक्कीच करू असे रायगड जिल्हा आदिवासी समाजाचे जिल्हाध्यक्ष रवी तांडेल यांनी स्पष्ट केले.

## मी समृध्द गाव समृध्द लखपती योजनेचा गिरणे येथे शुभारंभ; या योजने अंतर्गत कुटुंबे होणार लखपती?

**दै.रायगड नगरी । तळा**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाकरिता, तसेच नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्य शासनातर्फे 'मी समृद्ध, तर गाव समृद्ध' पर्यायाने महाराष्ट्र समृद्ध या धोरणांतर्गत 'लखपती कुटुंब' या संकल्पनेवर आधारित २०२२–२३ मध्ये लेबर बजेटचे रूपांतर समृद्धी बजेटमध्ये करण्यात येत आहे. या बजेटमध्ये प्रत्येक मातीच्या कणातून अधिक पैसा आणि प्रत्येक पाण्याच्या थेंबातून अधिक पैसा तसेच 'मागेल त्याला काम' वरून 'पाहिजे ते काम, गाव समृद्धी' वरून 'कुटुंब समृद्धी' असे आमूलाग्र बदल करून शेतकरी, शेतमजुरांना लखपती बनविण्यासाठी गावनिहाय समृद्धी बजेट तयार केले जाणार आहे.या योजनेचा शुभारंभ तळा तालुक्यातील गिरणे ग्रामपंचायतीत करण्यात आला.



या कार्यक्रमास तळा तहसीलदार श्री. कनशेट्टी,गिरणे ग्रामपंचायत सरपंच ज्योती कैलास पायगुडे, कृषी अधिकारी श्री.कांबळे, कृषी मंडळ अधिकारी श्री.वाडेकर, ग्रामसेवक खंडू काळे गिरणे ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील मजूर रोजगारासाठी महानगराकडे स्थलांतरित होतात. त्यामुळे त्यांना केवळ मजुरी मिळते. पण, मालमत्ता तयार होत नाही. परंतु, त्यांना गावपातळीवरच काम उप–लब्ध करून करण्यात येईल. त्यामुळे त्यांच्याकडे मालमत्तादेखील निर्माण होईल, यादृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत. यात सर्व घटकांना सहभागी करून घेतले जाणार आहे. आतापर्यंत यामधून फक्त रोजगाराकडे किंवा मजुरीकडे लक्ष दिले गेले; परंतु आता लेबर बजेटमधील 'समृद्धी बजेट' करण्याचे धोरण शासनाने आखले आहे. त्यामधून कोणती कामे घ्यायची, याचा निर्णय ग्रामपंचायत घेत असे; परंतु आता शेतकरी, शेतमजूर व ग्रामस्थांशी चर्चा करून, तसेच गावाचा सर्व्हे करून लेबर बजेट तयार होईल. या बजेटला पंचायत समिती, जिल्हा परिषद स्तरावर मंजुरी मिळाल्यानंतर कामे सुरू होतील. समृद्धी बजेट तयार करताना शिवार फेरी आणि गाव फेरीला महत्त्व दिले जाणार आहे. एवढेच नव्हे तर गावाच्या विकासाकरिता ग्रामस्थांची मते घेऊन आणि कुटुंबाच्या विकासाकरिता कुटुंबाची मते विच–ारात घेऊन बजेटमध्ये कामे टाकली जाणार आहेत. त्यानुसार टप्प्याटप्प्याने कामे हाती घेतली जातील यातून दुहेरी विकास साधला जाणार आहे.

एकरी एक लाख उत्पन्नासाठी प्रयत्न शेतकरी कुटुंबाला लखपती करण्यासाठी पीकपद्धतीत बदल करणे, शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची मानसिकता तयार केली जाणार आहे. त्यासाठी 'मी केले ते टिकेल' ही संकल्पना राबविली जाणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण, तसेच त्या माध्यमातून उपयुक्त सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत.

गावाचा माथा ते पायथा विकास 'कुटुंब समृद्ध, तर गाव समृद्ध' अशी शासनाची संकल्पना आहे. कुटुंब समृद्ध करण्यासाठी गावात विकासकामे घेऊन गावाचा माथा ते पायथा विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. शिक्षण, पोषण, सांडपाणी व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रस्ते, शेतमाल साठविण्यासाठी गुदाम, जलसंधारणाची कामे, सिंचनपद्धती, बाजारपेठ, सेंद्रिय शेती आदी कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

मी समृध्द गाव समृध्द लखपती योजनेमुळे गिरणे ग्रामपंचायतीचा कायापालट होणार असून आम्ही आगोदरच प्रत्येक कुटुंबाचे कॅम्प लावून जॉब कार्ड काढले आहेत त्यामुळे आम्ही या योजनेचं जास्तीत जास्त फायदा घेऊ व मनरेगा अंतर्गत अनेक प्रस्ताव ग्रामपंचयतीतर्फे पंचायत समितीला पाठवले आहेत. त्यामुळे या योजने अंतर्गत गिरणे ग्रामपंचायतीचा काया पालट होणार आहे. आणि या योजनेला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळेल असे सरपंच ज्योती पायगुडे यांनी यावेळी सांगितले.